# Inauguration of Direct Benefit Transfer (AADHAAR) on Tuesday 1st January, 2013 in Pilot district Wardha (Maharashtra)

Hon. State Minister, Govt. of Maharashtra, Shri Rajendra Mulak inaugurated Direct Benefit Transfer (AADHAAR) on Tuesday 1st January, 2013 in Pilot district Wardha (Maharashtra) at Vikas Bhavan in the presence of Collector Shri N. Navin Sona. Six schemes were covered in the first phase, for which payments were made through the Aadhaar-enabled mode. Funds were transferred to 15 beneficiaries under various schemes.

CPSMS-enabled end to end Direct Benefit Transfer was successfully implemented in Wardha, Maharashtra . Mrs. Farzana Akil Khan Pathan withdrew Rs. 500 using micro ATM .

Reported by : DIO NIC Wardha,






















**NEWS PAPER COVERAGE**

**Dainik Bhaskar & Lokmat, Dated Wednesday 2nd January, 2013 & Saturday 29th December, 2012**


दैनिक भास्कर | 16 शहर में बढ़ी... | नागपुर | बुधवार, 2 जनवरी 2013 | वर्धा. यवतमाल


## आधार संलग्नित 6 योजनाओं का वर्धा से शुभारंभ

# लाभार्थियों को घर पहुंच लाभ पहुंचाएं



### आधार के माध्यम से उठाएं लाभ

जिलाधिकारी एन. नवीन सोना ने कहा कि जिले में 12 लाख 99 हजार 592 जनसंख्या में से 10 लाख 82 हजार 268 लोगों का आधार में पंजीयन हो चुका है। 2 लाख 40 हजार 310 लोगों के बचत खाते खोले जा चुके हैं।

» पालकमंत्री राजेंद्र मुलक ने किया आह्वान

» विद्यार्थियों को आधार के माध्यम से सीधे छात्रवृत्ति

जिला प्रतिनिधि | वर्धा.

विविध केंद्र व राज्य सरकार की योजनाओं का लाभ सामान्य जनता तक सीधे पहुंचाने के लिए जिला प्रशासन व बैंकों से समन्वय स्थापित कर लाभार्थियों को आधार के माध्यम

विकास भवन में आयोजित सीधे लाभार्थियों को आधार के माध्यम से लाभ शुभारंभ अवसर पर वे बोल रहे थे। इस अवसर पर सिंचाई महामंडल के उपाध्यक्ष विधायक प्रा. सुरेशभाऊ देशमुख, विधायक अशोक शिंदे, जिप अध्यक्ष ज्ञानेश्वर नाना ढगे, नगराध्यक्ष आकाश शेंडे, सभापति गोपालराव कालोकर, राजस्व उपायुक्त एस.जी. गौतम, जिलाधिकारी एन. नवीन सोना, कार्यपालन अधिकारी शेखर चन्ने, वित्त नियोजन विभाग के उपसंचालक सतीश जाधव, देशपांडे उपस्थित थे। उन्होंने आगे कहा कि सामान्य जनता तक शासन की योजना पहुंचाने के

आवश्यक है। बैंकों को हर नागरिक के आधार कार्ड के माध्यम से बैंक बचत खाते खोलकर योजना आम आदमी तक पहुंचाएं।

आधार पंजीयन में वर्धा जिला ने उल्लेखीय कार्य करने पर लाभार्थियों को सीधे लाभ मिलने के लिए प्रायोगिक स्तर पर चयन किया गया है। आज से 6 योजनाओं का लाभ सीधे लाभार्थियों को दिया जाएगा। जिसमें विद्यार्थियों की शालातोत्तर छात्रवृत्ति, अस्वच्छ व्यवसाय में काम करनेवाले पालकों के बच्चों की छात्रवृत्ति, अन्य पिछड़ावर्गीय विद्यार्थियों की शालांत छात्रवृत्ति, अनुसूचित जाति के विद्यार्थियों की

गया है। आधार संलग्नित 6 योजनाओं का लाभ सीधे लाभार्थियों को पहुंचाने की महत्त्वकांक्षी योजना का शुभारंभ पालकमंत्री राजेंद्र राजेंद्र मुलक ने किया। छात्रा प्रियंका अनंतराव नारायणे को छात्रवृत्ति आधार के माध्यम से दी गई। शासन की विविध 34 योजनाओं को सीधे लाभ मिलने की योजना को शामिल किया गया है। जिसमें 11 हजार 562 लाभार्थियों को शामिल कर पहले चरण में 7 हजार 313 लाभार्थियों का आधार पंजीयन किया जा चुका है। इस अवसर पर अजीत कोरडे, निवासी उपजिलाधिकारी सुनील गाडे सहित विविध शाले के विद्यार्थी,

लोकमत
बुधवार
दि. २ जानेवारी २०१३

# सर्वसामान्य लाभार्थ्यांना आधारच्या माध्यमातून घरपोच लाभ द्या- ना.मुळक

## आधार संलग्न सहा योजनांचा शुभारंभ

वर्धा | दि. १ (जिल्हा प्रतिनिधी)

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ सामान्य जनतेपर्यंत थेट पोहचविण्यासाठी जिल्हा प्रशासन व बँकांनी समन्वय ठेवून लाभार्थ्यांना आधारच्या माध्यमातून थेट घरपोच लाभ द्या, असे आवाहन पालकमंत्री राजेंद्र मुळक यांनी आज केले.

आधार संलग्न सहा योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना देण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ पालकमंत्री राजेंद्र मुळक यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी प्रियंका अनंत नारायणे या विद्यार्थिनीला शालांतपूर्व शिष्यवृत्तीचा लाभ आधारच्या माध्यमातून देण्यात आला. राज्यातील विविध शिष्यवृत्ती आधारमार्फत यापुढे बचत खात्यात थेट जमा होणार आहे.



लाभार्थ्यांच्या खात्यातून काढलेल्या अनुदानाच्या रकमेचे वाटप करताना पालकमंत्री राजेंद्र मुळक, आ. सुरेश देशमुख, नाना ढगे, जिल्हाधिकारी एन.नवीन सोना, सीईओ शेखर चन्ने, उपसंचालक सतीश जाधव, उपायुक्त गौतम आदी.

विकास भवन येथे आयोजित थेट लाभार्थ्यांना आधारमार्फत निधी देण्याचा शुभारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार सुरेश देशमुख, आमदार अशोक शिंदे, नगराध्यक्ष आकाश शेंडे, जिल्हा परिषद अध्यक्ष ज्ञानेश्वर ढगे, सभापती गोपाळराव कालोकर, महसुल उपायुक्त एस.जी. गौतम, जिल्हाधिकारी एन. नवीन सोना, मुख्य कार्यपालन अधिकारी शेखर चन्ने, केंद्रीय अर्थ नियोजन विभागाचे उपसंचालक सतीश जाधव, देशपांडे आदी उपस्थित होते.

आधार नोंदणीमध्ये वर्धा जिल्ह्याने देशात केलेल्या उल्लेखनीय कार्यांमुळे लाभार्थ्यांना थेट योजनांचा लाभ देण्यासाठी प्रायोगिक स्तरावर जिल्ह्याची निवड झाली आहे. आजपासून विविध सहा योजनांचा लाभ या अंतर्गत देण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना शालांतोत्तर शिष्यवृत्ती, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शालांतपूर्व . शिष्यवृत्ती, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शालांत पूर्व शिष्यवृत्ती, अनुसूचित जातींच्या मुलांसाठीची शिष्यवृत्ती, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती व जननी सुरक्षा योजनेचा समावेश आहे.

शासनाच्या विविध ३४ योजनांचा थेट लाभार्थ्यांना अनुदान या योजनेमध्ये समावेश करण्यात आला असून, पहिल्या टप्प्यात वर्धा जिल्ह्यात आठ योजना राबविण्यात येणार आहेत. यामध्ये ११ हजार ५६२ लाभार्थ्यांचा समावेश राहणार आहे. पहिल्या टप्प्यातील ७ हजार ३१३ लाभार्थ्यांची आधार नोंदणी पूर्ण झाली आहे. बँकेमार्फत लाभ देण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली.

ना.मुळक पुढे म्हणाले, सामान्य जनतेपर्यंत शासनाच्या योजना सुलभपणे पोहचविण्यासाठी आधार हा राजमार्ग ठरत आहे. सामान्य माणसाला ज़लद गतीने आणि वेळेवर मदत पोहचविणे अत्यंत आवश्यक आहे. बँकांनी यासाठी पुढाकार घेतांनाच प्रत्येक नागरिकांचे आधारकार्ड व बँकेत बचत खाते उघडून शंभर टक्के लाभार्थ्यांपर्यंत ही योजना पोहचवून आदर्श निर्माण करावा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर आधारच्या माध्यमातून सीपीएसएमएस व प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बचत खात्यात शिष्यवृत्ती जमा करण्यात आली व मायक्रोएटीएमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार बचत खात्यातून थेट रोख रक्कम पालकमंत्र्यांच्या हस्ते यावेळी देण्यात आल्या. तसेच जननी सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांनाही थेट लाभ देण्यात आला.

जिल्हाधिकारी एन.नवीन सोना यांनी स्वागत करून प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांना आधारच्या माध्यमातून थेट शिष्यवृत्तीची रक्कम देण्याच्या उपक्रमाची माहिती दिली. जिल्ह्यातील १२ लक्ष ९९ हजार ५९२ लोकसंख्येपैकी १० लक्ष ८२ हजार २६८ लाभार्थ्यांचे आधार नोंदणी पूर्ण झाली असून २ लक्ष ४० हजार ३१० बचतखाते आधार नोंदणीची संलग्न करण्यात आल्याची माहितीही यावेळी त्यांनी दिली.

# फरजाना देशातील पहिली लाभार्थी

## आधारबेस डायरेक्ट कॅश ट्रान्सफर योजनेचा वर्धेतून शुभारंभ

राजेश भोजेकर | दि. २८ (वर्धा)

आधारमार्फत शासकीय योजनांची थेट राशी (आधारबेस डायरेक्ट कॅश ट्रान्सफर) या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा आज वर्धा जिल्ह्यातून प्रारंभ झाला. आर्वी तालुक्यातील पानवाडी येथील फरजाना शकील खाँ पठाण या महिलेला जननी सुरक्षा योजनेची लाभार्थी म्हणून युआयडी क्रमांकाच्या आधारावर मायक्रो एटीएममार्फत थेट राशी देण्यात आली. ही महिला या योजनेला लाभ घेणारी देशातील पहिली लाभार्थी ठरली आहे.



▼ जिल्हाधिकारी एन.नवीन सोना यांच्या हस्ते आधारमार्फत योजनेचा थेट लाभ घेताना देशातील पहिली लाभार्थी फरजाना शकील खाँ पठाण.

देशातील ४३ जिल्ह्यांमध्ये आधारबेस डायरेक्ट कॅश ट्रान्सफर ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या वित्त विभागाने घेतला होता. यामध्ये महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांमध्ये नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्याला हा मान मिळाला. इतकेच नव्हे, तर शासनाच्या लेखी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत वर्धा जिल्ह्याने युआयडी क्रमांक मिळवून ते बँकेच्या खात्याशी लिंक करण्यातही पहिला क्रमांक मिळविला. जिल्ह्यात असलेल्या १३ लाख लोकसंख्येपैकी ८५ टक्के लोकांनी युआयडी क्रमांक काढून ते बँक खात्याशी लिंक केले आहे. आतापर्यंत १० लाख लोकांनी राष्ट्रीय बँकेत आपले खाते उघडले आहे.

ही भरारी बघता वर्धा जिल्ह्यातून आधारबेस डायरेक्ट कॅश ट्रान्सफर योजनेचा शुभारंभ करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला होता. या योजनेचा शुभारंभ करण्यासाठी खुद्द केंद्रीय वित्त मंत्री पी. चिदंबरम येणार होते. मात्र काही अपरिहार्य कारणाने त्यांचा दौरा पुढे ढकलण्यात आला. मात्र शासनाच्या निर्णयानुसार आज (दि.२८) जिल्हाधिकारी एन. नवीन सोना यांच्या हस्ते येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या प्रसूती विभागात भरती असलेल्या सात महिलांना जननी सुरक्षा योजनेंतर्गत थेट राशी देऊन शुभारंभ करण्यात आला.

या लाभार्थ्यांमध्ये फरजाना अकील खाँ पठाण रा. पानवाडी ता. आर्वी, राणी विक्की व्यास रा. पुलफैल वर्धा, समीता मनोहर बोंडे, कानोली बारा त. हिंगणी जि. नागपूर, प्रिती हंसराज आत्राम रा. भानखेडा त. जि. वर्धा, ललिता प्रकाश खवसे रा. अहिंसानगर आलोडी वर्धा, प्रीती धीरज कोकाडे रा. रामनगर वर्धा व ज्योती मंगेश कुमरे यांचा समावेश आहे.

याप्रसंगी जिल्हा शल्य शल्यचिकित्सक डॉ. मिलिंद सोनोने, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, केंद्रीय वित्त मंत्रालयाचे प्रतिनिधी व आधारचे उपसंचालक सतीश जाधव,

महाराष्ट्र
महाराष्ट्र भूष
SERIES SB-256 SB-